**<u>प्रेस नोट</u>** **<u>दिनांक :- १७/०८/२०२६</u>**

**<u>इंस्टाग्राम या सोशल मिडीया माध्यमातुन नामांकित शिक्षण संस्थेमध्ये प्रवेश मिळवून देण्याच्या बहाण्याने भारतातील वेगवेगळया राज्यातील लोकांची आर्थिक फसवणुक करणा-या दोन बोगस कॉल सेंटरवर पवई पोलीस ठाणेकडुन कारवाई करून गुन्हा उघडकिस आणलेबाबत ..</u>**

फिर्यादी नामे श्रीमती ग्रेसी पिटर स्वामी, वय ४७ वर्षे, रा.ठी. रू. नं. ६०१, शिव ओम , कौ. ऑ. हौ. सो. गोखले नगर, आय आय टी पवई मुंबई यांचे मुलास नामांकित शिक्षण संस्था IIIT हैद्राबाद येथे ॲडमिशन मिळवून देतो असे इन्स्ट्राग्राम अकांउट techorbit1111 चे धारकाने जहिरात देवुन इसम नामे गौतम व सुमीत यांनी फिर्यादीला संपर्क करून IIIT हैद्राबाद येथे ॲडमिशन करून देतो असे सांगुन एकुण रू.१६,५०,०००/- घेवुन त्यांची आर्थीक फसवणुक केली असल्याची तक्रार प्राप्त झाल्याने इसम नामे गौतम व सुमीत याच्या विरूध्द दिनांक १७/०७/२०२६ रोजी गुरक्र. ७६७/२६ कलम ,३१८(४), ३१९(२),भा.न्या.सं.अधिनियम अन्वये पवई पोलीस ठाणेस दाखल करण्यात आला आहे. सदचा गुन्हा दाखल होताच बॅकेशी तात्काळ पत्र व्यवहार करून फसवणुक करण्यात आलेली रक्कम गोठविण्यात आली आहे.

गुन्हयाचे तांत्रिक तपासादरम्यान फिर्यादी महिलेकडुन फसवणुक करून घेतलेल्या रक्कमेमधून ०५ मोबाईल खरेदी केले असल्याचे निष्पन्न झाले होते.सदर मोबाईलचे लोकेशनचा तांत्रिक व मानवी कौशल्याचे आधारे सातत्यपुर्ण तपास करून स्थानिक पोलीसाच्या मदतीने दिनांक १४/०८/२०२६ रोजी आरोपी राहत असलेल्या रुम नं ६०३, ६ वा मजला, निऑन होम्स, विमाननगर, लोहगाव, पुणे या पत्यावर छापा टाकला असता एकुण १० आरोपी हे काही संशयास्पद मोबाईल व कागदपत्रांसह मिळुन आले.

आरोपीकडे केलेल्या तपासामध्ये नमुद आरोपीतांनी नामांकित शिक्षण संस्थेमध्ये प्रवेश देण्याच्या बाहण्याने लोकांची फसवणुक करण्यासाठी दोन ठिकाणी बोगस कॉल सेंटर चालवत असल्याचे सांगितले. त्यानंतर खालील बोगस कॉल सेंटर वर छापे टाकुन कॉल सेंटर चालवण्यासाठी लागणारे मोबाईल्स व इतर साहित्य जप्त केले.

१) **कॉल सेंटर क्रमांक ०१:- निऑन होम्स या बिल्डींग मधील रु.नं२०४, ४०४, ६०३, विमाननगर, लोहगाव,पुणे**

**जप्त केलेले साहित्य :-** वेगवेगळया कंपनीचे ०५ मोबाईल, १८ सिमकार्ड , कॉलेज व इतर इन्सिटयुट यांचे नाव असलेले व मोबाईल क्रमांक असलेले कागदपत्रे ,बी.एम. डब्लु कार, मारूती कंपनीची सियाझ कार.

२) **कॉल सेंटर क्रमांक ०२ - ऑफिस नं १२,तिसरा माळा, सिटी विस्टा बिल्डींग, खराडी, पुणे.**

**जप्त केलेले साहीत्य:_** वेगवेगळया कंपन्यांचे ०४ मोबाईल, वेगवेगळया कंपन्यांचे ०२ हार्ड डिस्क, ०१ एच पी कंपनीचा लॅपटॉप. जिओ कंपनीचे जिओ बुक, वेगवेगळया बँकांचे ०७ डेबीट कार्ड, जिओ कंपनीचे ०५ सिमकार्ड. तसेच आरोपीचे अंगझडतीमधील एकुण १३ मोबाईल.

**नमुद गुन्हयात एकुण १० आरोपीना अटक करण्यात आले असुन त्यांचेकडुन एकुण २२ मोबाईल, २३ सिमकार्ड, ०१ एच पी कंपनीचा लॅपटॉप, ०७ डेबिट कार्ड, ०१ जिओ बुक, ०२ कार व आरोपीने फसवणूक करण्यासाठी वापरलेल्या बँक अकाउंट मधील २४ लाख अशी एकुण ०१ कोटी ३५ लाख २७ हजार रू . किंमतीचा मुददेमाल हस्तगत करण्यात आला आहे.**

**<u>आरोपींची कार्यपध्दती</u> -** नमूद आरोपी हे इंजिनिअरींग प्रवेश प्रक्रियेच्या कालावधीतच इच्छुक पालक व विदयार्थी यांना इन्स्टाग्राम ॲड च्या माध्यमातून संपर्क साधून त्यांचा विश्वास संपादन करत असत. त्यानंतर इतर आरोपी हे बोगस सिम कार्डचा वापर करुन व्हॉटस ॲप चॅटच्या माध्यमातून, पालक/विदयार्थी ज्या शिक्षण संस्थेत प्रवेश घेण्यास इच्छुक आहेत त्याची माहिती प्राप्त करुन त्याच शिक्षण संस्थेच्या कॅम्पस/परिसरात भेट घेवून शिक्षण संस्थेच्या प्रशासनात आपली ओळख आहे असा बनाव करुन सदर आरोपी इसम हे विदयार्थी/पालक यांच्या समोर दिखावा करत असत. सदर विश्वासाचा गैरफायदा घेत नमूद आरोपी हे पालक/ विदयार्थी यांच्याकडून टोकन अमाउंट, ॲडवान्स/प्रथम वर्षाची शैक्षणिक फी या नावाखाली बहुधा रोख स्वरुपात व जे पालक/विदयार्थी रोख रक्कम दयावयास तयार नाहीत त्यांच्याकडून बँक खात्यात रक्कम स्वीकारत असत. नमूद आरोपी हे सन २०१९ पासून सदर कॉलसेंटरच्या माध्यमातून ॲडमिशन देण्याच्या नावाखाली लोकांची फसवणूक करीत होते.

नमुद आरोपींना दिनांक १५/०८/२०२६ रोजी मा. न्यायालयासमक्ष हजर केले असता मा. न्यायालयाने नमुद आरोपीना दिनांक २०/०८/२०२६ रोजी पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. गुन्हयाचे तपासांमध्ये महाराष्ट्र राज्यातील मुंबई ०१, नागपुर ०१, उत्तर प्रदेश राज्यातील ०२, कर्नाटक राज्यातील ०१, गुजरात राज्यातील ०१, असे एकुण ०६ गुन्हे उघडकीस आले आहेत. त्याव्यतीरीक्त पंचनामा अंतर्गत एकंदरीत ३० मोबाईल नंबर असलेली यादी व PICT (Pune Institute of Computer Technology), NSUTI (Netaji Subhash Chandra University of Technology), DTU (Delhi Technological University) अशा कॉलेजची लिस्ट मिळून आली असून त्या अनुषंगाने तपासामध्ये इतर गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

सदरची कामगिरी मा.श्री. देवेन भारती पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, मा.श्री. मनोजकुमार शर्मा पोलीस सह आयुक्त (का व सु) बृहन्मुंबई, मा.श्री. अभिनव देशमुख अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, मा.श्री. दत्ता नलावडे पोलीस उप आयुक्त, पश्चिम परिमंडळ - ३, मा.श्री. दादासाहेब घुटुकडे सहाय्यक पोलीस आयुक्त, साकिनाका विभाग व मा.श्री. आत्माजी सावंत वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पवई पोलीस ठाणे यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. सुशांत बडगर पोलीस निरीक्षक (गुन्हे), जयदीप गोसावी, पोलीस निरीक्षक (तपासी अधिकारी) तसेच सायबर अधिकारी पोउनि प्रशांत केंद्रे, पोउनि सागर जाधव व पो.ह. सुरनार, पो.ह. पिसाळ, पो. शि. घाडगे, पो. शि. राठोड, पो. शिपाई, शिरसाठ,म.पो.शि.येवले यांनी पार पाडली आहे.